# ३४ शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण

भाषा हे आपले विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. भाषा ही विविध शब्द, वाक्य यांनी तयार होते. केवळ अनेक शब्द एकापुढे एक ठेवून वाक्य तयार होईल. परंतु आपल्याला द्यावयाचा संदेश, व्यक्त करावयाची भावना, विचार प्रभावी होण्याकरिता योग्य, सूचक आणि पोषक शब्दांची योजना करावयास हवी. अनेक शब्दांतून योग्य शब्दांची निवड आपल्याला करता आली पाहिजे. प्रत्येक शब्दामध्ये प्रकट होण्याची अंगभूत शक्ती असते. ही शब्दशक्ती वापर करणाऱ्यास अचूक माहिती हवी.

विज्ञानविषयक लेखनात शास्त्रीय संबोध नेमक्या शब्दात व्यक्त करणाऱ्या म्हणजे लेखनात एकच एक अर्थ प्रकट करणाऱ्या शब्दाला महत्त्व असते. पण वाङ्मयात, विशेषतः सर्जनशील लेखनात, काव्यसौंदर्य प्रकट करणाऱ्या, आपल्या बोलण्यातून अपेक्षित अर्थ गहिरेपणाने प्रकट करणाऱ्या अर्थाच्या विविध रूपांना महत्त्व असते. त्यासाठी शब्दाच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तींचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरतो.

एकाच वाक्याला, काव्याला अनेक अर्थ असणे हे उत्तम लेखनाचे वैशिष्ट्य आहे. लेखनातून प्रकट होणारा अर्थ हा वाच्यार्थ, व्यंग्यार्थ व लक्ष्यार्थ अशा तीन पातळीवर व्यक्त होत असतो. तो समजण्यासाठी शब्दांच्या ठिकाणी असलेल्या शब्दशक्तींचा परिचय/अभ्यास आवश्यक ठरतो.

शब्दाच्या ठिकाणी प्रामुख्याने तीन शक्ती मानल्या गेल्या आहेत. १) अभिधा, २) व्यंजना, ३) लक्षणा

## अभिधा

- एखादा शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा एक शब्दशः, शब्दकोशगत सरळ व रूढ अर्थ समजतो. लोकांनी संकेताने तो ठरविलेला असतो.

  पुढील वाक्य पाहा.

  'साप मारायला हवा.'
- 'साप' हा शब्द उच्चारल्याबरोबर किंवा वाचल्याबरोबर 'एक सरपटणारा प्राणी' एवढे आपल्याला कळते.
- हा **अर्थ व्यक्त करण्याची या शब्दातली ही जी शक्ती, तिला अभिधा असे म्हणतात.**
- या अभिधा शक्तीच्या साहाय्याने प्रगट होणारा जो अर्थ त्यास **वाच्यार्थ** म्हणतात.

**अभिधा शब्दशक्तीचे तीन प्रकार पडतात.**

**१) योग अभिधा -**

योग म्हणजे उत्पत्ती/व्युत्पत्ती, व्युत्पत्तीने जेव्हा शब्दाचा अर्थ सांगता येतो, तेव्हा त्या शब्दशक्तीला योग अभिधा म्हणतात.

उदा.-
- श्रध्देय - श्रद्धायोग्य
- दर्शनीय - दर्शनयोग्य
- भारतीय - भारतातील
- पाठक - पाठ करणारा

**२) रूढ अभिधा -**

शब्दाला जेव्हा रूढी आणि परंपरेने अर्थ प्राप्त होतो तेव्हा त्या शब्दशक्तीला रूढ अभिधा असे म्हणतात. येथे शब्दांचे घटकावयव पाडून व्युत्पत्तीने अर्थ काढता येत नाही.

उदा.- मंडप, अश्व, डोंगर, फळा, हत्ती, गृह, झाड

### ३) योगरूढ अभिधा -

शब्दाची जेव्हा व्युत्पत्ती सांगता येते परंतु अर्थ मात्र रूढीने निश्चित केला जातो. तेव्हा त्या शब्दशक्तीला योगरूढ अभिधा असे म्हणतात. घटकावयवांच्या स्वतंत्र अर्थाप्रमाणे त्यांचा अर्थ घेता येत नाही.

| योगरूढ अभिधा | व्युत्पत्ती | रूढीने घेतला जाणारा अर्थ |
|---|---|---|
| पंकज | **पंक** म्हणजे चिखल<br>**ज**- म्हणजे जन्मणारे<br>पंकज म्हणजे चिखलात जन्मणारे<br>उदा.- कमळ, बेडूक, कीटक, गवत | कमळ |
| खग | **ख** म्हणजे आकाश<br>**ग**- म्हणजे गमन करणारे (फिरणारे)<br>खग- आकाशात फिरणारे<br>उदा. पक्षी, ग्रह, तारे, उपग्रह, विमाने | पक्षी |
| सर्प | **सर्प** म्हणजे सरपटणारे<br>उदा. साप, सरडा, पाल, मगर | साप |

## व्यंजना

आता पुढील वाक्य पाहा.

'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत.'

- या वाक्यात लेखकाला किंवा हे उच्चारणाऱ्या व्यक्तीला 'साप' या शब्दाचा वाच्यार्थच केवळ अभिप्रेत नाही. 'साप' या शब्दातून 'दुष्ट' माणसे असा त्यातून ध्वनित होणारा दुसरा एक अर्थ सुचवायचा आहे.
- म्हणजे **मूळ अर्थाला बाधा न आणता दुसरा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती आहे, तिला व्यंजना शक्ती असे म्हणतात.**
- या शक्तीने प्रकट होणाऱ्या अर्थाला **व्यंग्यार्थ** असे म्हणतात.
- **उदा.** पाच वाजले. या वाक्याचा वाच्यार्थ म्हणजे 'घड्याळाने पाच वाजल्याचे दर्शविले.' पण या वाक्यावरून निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळे इतर अर्थ कळतात.
- शाळेतल्या मुलांना वाटते, 'शाळा सुटण्याची वेळ झाली.',
- बाबांना वाटते, 'चहा घेण्याची वेळ झाली.'
- आजीला वाटते, 'देवळात जायची वेळ झाली.',
- शाळेच्या शिपायाला वाटते, 'शाळा बंद करण्याची वेळ झाली.'
- मूळ अर्थ आहे तसा राहून त्यातून जो दुसरा अर्थ सूचित होतो त्यास **व्यंग्यार्थ** म्हणतात. काव्यात या व्यंग्यार्थाला विशेष महत्त्व असते.
- मुख्यार्थाला बाध न येता शब्दोच्चाराबरोबर रसिकाच्या अंत:करणात वाच्यार्थाहून भिन्न अशा रमणीय अर्थाची जी अनंत वलये निर्माण होतात त्यांना व्यंग्यार्थ किंवा **ध्वन्यर्थ** असे नाव आहे.
- मुख्यार्थ्याला बाधा न पोहचता एकापेक्षा अधिक अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला साहित्यशास्त्रात व्यंजना असे म्हणतात.
- व्यंजना शब्दशक्ती जो अर्थ व्यक्त करते त्या अर्थाला व्यंग्यार्थ, ध्वन्यर्थ किंवा **प्रतियमान** अर्थ असे

म्हणतात.

- व्यंजना शक्तीने ऐकणाऱ्याला जे एकापेक्षा अधिक अर्थ कळतात, त्या अर्थाची प्रचिती ऐकणाऱ्याला यावी लागते, म्हणून त्या अर्थाला **प्रतियमान अर्थ** असे म्हणतात.

सूचक काव्यात्म लेखनासाठी व्यंजना महत्त्वपूर्ण ठरते. सूचकता, ध्वन्यार्थ, व्यंजना असलेले काव्य श्रेष्ठ व अधिक परिणामकारक होते.

**व्यंजना शक्तीचे दोन प्रकार पडतात.**

१) शाब्दी व्यंजना

२) आर्थी व्यंजना

**१) शाब्दी व्यंजना -**

व्यंजना जेव्हा शब्दावर आधारलेली असते तेव्हा त्या व्यंजनेला शाब्दी व्यंजना असे म्हणतात.

शाब्दी व्यंजनेचे दोन प्रकार - अ) **अभिधामूलक शाब्दी व्यंजना** ब) **लक्षणामूलक शाब्दी व्यंजना**

अ) **अभिधामूलक शाब्दी व्यंजना** - एकाच शब्दाचे दोन मुख्यार्थ असतात. त्यातील एक निश्चित होऊन सूचकतेने जाणवतो, तेव्हा त्या शब्दशक्तीला अभिधामूलक शाब्दी व्यंजना असे म्हणतात.

उदा.- १) मी आता **मुक्याचे** व्रत सोडणार नाही. (मुका - मौनव्रत; चुंबन)

- मुका या शब्दाचे 'वाचा नसलेला' आणि 'चुंबन' हे दोन्ही मुख्यार्थच असल्याने ही अभिधामूलक शाब्दी व्यंजना ठरते.

२) आयुष्यात प्रथमच **हार** स्वीकारण्याची वेळ आली. (हार - फुलांची माळ; पराभव)

- हार या शब्दाचे फुलांची माळ आणि पराभव हे दोन्ही मुख्यार्थच असल्याने ही अभिधामूलक शाब्दी व्यंजना ठरते.

ब) **लक्षणामूलक शाब्दी व्यंजना** - मुख्यार्थाला बाधा येऊन लक्ष्यार्थ व्यक्त होतो. लक्षणेचे प्रयोजन समजण्यासाठी जेव्हा आपल्याला व्यंजना शक्तीचा आधार घ्यावा लागतो, तेव्हा त्या शब्दशक्तीला लक्षणामूलक शाब्दी व्यंजना असे म्हणतात.

उदा.- १) गंगायां घोष: (घोष - गोशाळा, वाडा)

- गंगा नदीचे निकट सान्निध्य, गंगेच्या काठावर वाडा

२) मी गदिमा वाचले.

- ग.दि.माडगूळकर यांची साहित्यसंपदा वाचली.

**२) आर्थी व्यंजना -**

व्यंजना जेव्हा अर्थावर आधारलेली असते तेव्हा त्या व्यंजनेला आर्थी व्यंजना म्हणतात. संस्कृत साहित्य शास्त्रज्ञांनी व्यंजना व्यापाराचे अतिसूक्ष्म असे भेद वर्णिले आहेत. आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार हे यापैकी प्रमुख होत.

आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार - अ) **वस्तुध्वनी** ब) **रसध्वनी** क) **अलंकारध्वनी**

अ) **वस्तुध्वनी** - वाच्यार्थातून व्यक्त होणारा ध्वन्यर्थ कधी केवळ वस्तूचा किंवा कल्पनेचा आविष्कार करतो. येथे व्यंग्य केवळ वस्तुरूप असते तेव्हा वस्तुध्वनी होतो. 'सूर्यास्त झाला' या वाक्यातील अर्थाच्या विविध छटा श्रोत्यांच्या मनावर उमटतात त्या केवळ वस्तुरूप आहेत. केवळ विचार किंवा कल्पनारूप आहेत म्हणून

हा वस्तुध्वनी होय.

१) **सूर्यास्त** झाला. (संध्याकाळ झाली, स्नानसंध्येची वेळ झाली, घरी जाण्याची वेळ झाली)

२) **घंटा** झाली. (शाळा सुटली, शाळा भरली, दहा वाजले, सहा वाजले)

३) **पाच** वाजले. (शाळा सुटली, उशीर झाला, चहा घेऊ या)

४) समाजात वावरणारे असले **साप** ठेचून काढले पाहिजेत. (साप - वाईट प्रवृत्ती, वाईट लोक, गुन्हेगार)

**अलंकारध्वनी** आणि **रसध्वनी** या ध्वनींची उदाहरणे संस्कृत साहित्यात सापडतात.

## लक्षणा

- आपल्या नेहमीच्या बोलण्यात असे काही शब्द वा वाक्ये येतात, की त्यांचा शब्दशः अर्थ घेतला, तर भलताच अर्थ निर्माण होतो. अशा वेळी शब्दशः अर्थ न घेता त्याच्याशी सुसंगत असलेला असा दुसराच अर्थ घ्यावा लागतो.

**उदा.** जेवणाची पाने वाढून तयार झाली की आपण म्हणतो, 'चला, पानावर बसा.'

या ठिकाणी 'पानावर' याचा शब्दशः अर्थ घेतला, तर अनर्थ होईल म्हणून त्याचा अर्थ 'पानाशेजारी' किंवा 'पाटावर' असा घेणे इष्ट ठरते.

- तसेच 'आम्ही गहू खातो.' याचा अर्थ 'गहू' हे धान्य असा न करता 'गव्हापासून तयार केलेले पदार्थ' असाच करायला हवा

म्हणजे **शब्दाच्या मूळ अर्थाला बाधा येत असेल, तर त्याला जुळेलसा दुसरा अर्थ घ्यावा लागतो. शब्दाच्या या शक्तीस लक्षणा शक्ती असे म्हणतात**

या शक्तीमुळे प्रगट होणाऱ्या अर्थास **लक्ष्यार्थ** असे म्हणतात.

- मुख्यार्थाला बाधा येऊन त्याच्यांशी संबंधित असणारा अर्थ आपल्याला समजतो तेव्हा त्या अर्थाला लक्ष्यार्थ असे म्हणतात.
- लक्ष्यार्थ व्यक्त करणारी शब्दशक्ती म्हणजेच लक्षणा होय.

लक्ष्यार्थ घेण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते

**१) मुख्यार्थबाध**

**२) लक्ष्यार्थ-मुख्यार्थ संबंध**

**३) रूढी किंवा प्रयोजन**

- 'घरावरून हत्ती गेला' या वाक्यात घरावरून शब्दाचा मुख्यार्थ घेतल्यास अर्थ लागत नाही. मुख्यार्थाला येथे बाध येतो. म्हणूनच लक्ष्यार्थाकडे जावे लागते. पण हा लक्ष्यार्थ कोणत्यातरी परीने मुख्यार्थाशी संबंधित असतो.
- मुख्यार्थ उपयोगी पडत नाही अशी वाक्यरचना तरी आपण का करतो? काहीतरी प्रयोजन म्हणजेच हेतू असल्याशिवाय आपण अशी वाक्ययोजना करत नाही. 'हत्ती घरासमोरून गेला' असे न सांगता 'घरावरून' असे म्हणण्याने समीपता दाखविणे हा हेतू आहे. कित्येक वेळा रूढीमुळे हेतू लुप्त झालेला असतो, मात्र हेतूशिवाय लक्ष्यार्थ सिद्ध होत नाही.

**लक्षणा शब्दशक्तीचे दोन प्रकार पडतात.**

**१) निरूढा लक्षणा**

**२) प्रयोजनवती लक्षणा**

### १) निरूढा लक्षणा -

शब्दाचा लक्ष्यार्थ जेव्हा मुख्यार्थ बनतो व त्यामागे रूढी आणि परंपरा कारणीभूत ठरते, तेव्हा त्या शब्दशक्तीला निरूढा लक्षणा म्हणतात.

| निरूढा लक्षणा | मुख्यार्थ | लक्ष्यार्थ | रूढीने बनलेला मुख्यार्थ |
|---|---|---|---|
| प्रवीण | उत्तम वीणा वाजविणारा | चतुर, निपुण, निष्णात | चतुर, निपुण, निष्णात |
| कुशल | चांगल्या प्रकारे कुश (दर्भ) तोडणारा | चतुर, निपुण, निष्णात | चतुर, निपुण, निष्णात |

'भाषाभ्यासाची सामाजिक दृष्टी' या निबंधामध्ये श्री. म. माटे यांनी इंगा फिरविणे, ठिय्या देऊन बसणे, सव्यापसव्य करणे अशा वाक्प्रचारांबाबत निरूढा लक्षणेचे वर्णन केले आहे. कारण बहुतांश वाक्प्रचारांबाबत कालांतराने योजकाने योजलेला लक्ष्यार्थ हाच मुख्यार्थ झाला आहे.

### २) प्रयोजनवती लक्षणा -

वाच्यार्थाच्या जागी वेगळा अर्थ घेण्याला काहीतरी हेतू किंवा प्रयोजन असते, तेव्हा त्या लक्षणेला प्रयोजनवती लक्षणा असे म्हणतात.

**प्रयोजनवती लक्षणेचे दोन प्रकार पडतात.**

**१) गौणी लक्षणा**

**२) शुद्धा लक्षणा**

**गौणी लक्षणा -** लक्षणा जेव्हा समान गुणांवर आधारलेली असते, तेव्हा त्या लक्षणेला गौणी लक्षणा असे म्हणतात.

गौणी लक्षणेला समान गुण किंवा सारखेपणा असतो. म्हणून त्या लक्षणेला सादृश्य लक्षणा असेही म्हणतात.

**गौणी लक्षणेचे दोन प्रकार पडतात.**

**१) सारोपा गौणी लक्षणा**

**२) साध्यवसाना गौणी लक्षणा**

### १) सारोपा गौणी लक्षणा -

सारोपा म्हणजे आरोपासहित. लक्षणा करताना एका वस्तूचा आरोप जेव्हा दुसऱ्या वस्तूवर केला जातो व त्या दोन वस्तूंमध्ये समान गुण असतो, तेव्हा त्या लक्षणेला सारोपा गौणी लक्षणा असे म्हणतात.

**उदा.-** १) तिचे मुख म्हणजे **चंद्रबिंबच** होय. (चंद्रासारखे सुंदर)

- इथे मुखावर चंद्राचा आरोप केला आहे.

२) तिचे दात म्हणजे **मोत्याचे दाणे**. (मोत्याप्रमाणे पांढरे व चमकणारे)

- इथे दातांवर मोत्याचा आरोप केला आहे.

### २) साध्यवसाना गौणी लक्षणा -

अध्यवसान करणे म्हणजे लोप किंवा नाहीसे करणे. लक्ष्यार्थाचा आरोप मुख्यार्थावर करताना मुख्यार्थाचे अध्यवसान केले जाते. तेव्हा त्या लक्षणेला साध्यवसाना गौणी लक्षणा असे म्हणतात.

**उदा.-** १) (तिच्या चेहऱ्याकडे पाहून) जणू **चंद्रच** भूतलावर अवतरला आहे.

- इथे **मुख** शब्दाचे अध्यवसान झाले आहे.

२) (तिच्या दातांकडे पाहून) **मोती** उमलले.

- इथे **दात** शब्दाचे अध्यवसान झाले आहे.

## २) शुद्धा लक्षणा (सादृश्येतर)

लक्षणा जेव्हा समान गुणावर आधारलेली नसून ती कार्यकारणभावावर आधारलेली असते, तेव्हा त्या लक्षणेला शुद्धा लक्षणा असे म्हणतात.

शुद्धा लक्षणेमध्ये समान गुणधर्म नसतो म्हणून त्या लक्षणेला सादृश्येतर शुद्धा लक्षणा असे म्हणतात.

**शुद्धा लक्षणेचे चार प्रकार पडतात.**

**१) सारोपा शुद्धा लक्षणा**

**२) साध्यवसाना शुद्धा लक्षणा**

**३) उपादान शुद्धा लक्षणा/अजहल्लक्षणा**

**४) लक्षणलक्षणा शुद्धा लक्षणा/जहल्लक्षणा**

### १) सारोपा शुद्धा लक्षणा -

कार्यकारणभावावर आधारलेला लक्ष्यार्थाचा आरोप जेव्हा मुख्यार्थावर केला जातो, तेव्हा त्या लक्षणेला सारोपा शुद्धा लक्षणा असे म्हणतात.

**उदा.-** १) **संप** म्हणजे **सामान्यांचे मरणच.**

२) **आंबा** खाणे म्हणजे **बलसेवनच** होय.

### २) साध्यवसाना शुद्धा लक्षणा -

लक्ष्यार्थाचा मुख्यार्थावरती आरोप करताना मुख्यार्थाचे अध्यवसान (लोप) केले जाते.

**उदा.-** १) (संपाची परिस्थिती लक्षात घेऊन) **सामान्यांवर मरणच** ओढवले आहे.

२) (त्याला आंबा खाताना पाहून) तू साक्षात **बलसेवनच** करत आहेस.

### ३) उपादान शुद्धा लक्षणा/अजहल्लक्षणा -

शब्दाचा मुख्यार्थ जेव्हा लक्ष्यार्थाला सोडून जात नाही, तो त्याच्याबरोबर प्रकट होतो, तेव्हा त्या लक्षणेला उपादान शुद्धा लक्षणा असे म्हणतात.

जहत् - जहत् म्हणजे मुख्यार्थ सोडून

अजहत् - अजहत् म्हणजे मुख्यार्थ न सोडता.

या लक्षणेमध्ये लक्ष्यार्थ हा मुख्यार्थाला सोडून जात नाही म्हणून ह्या लक्षणेला अजहल्लक्षणा असे म्हणतात.

**उदा.-** १) पानिपतावर सव्वालाख **बांगडी फुटली.**

सव्वा लाख सैन्य मेले - वैधव्य आले - लक्ष्यार्थ

बांगडी फुटली - मुख्यार्थ

२) किल्ल्यातून शंभर **तलवारी** बाहेर पडल्या.

तलवारधारी सैन्य - लक्ष्यार्थ

तलवारी - मुख्यार्थ

### ४) लक्षण लक्षणा शुद्धा लक्षणा/जहल्लक्षणा -

या लक्षणेमध्ये मुख्यार्थ लक्ष्यार्थाला पुढे करून स्वत: लुप्त होतो. तेव्हा त्या लक्षणेला लक्षण लक्षणा शुद्धा लक्षणा असे म्हणतात.

या लक्षणेत मुख्यार्थ लक्ष्यार्थाला सोडून जातो म्हणून या लक्षणेला जहल्लक्षणा असे म्हणतात.

**उदा.-** १) आम्ही **गहू** खातो. (गव्हापासून केलेले पदार्थ)

२) आमच्या **घरावरून** हत्ती गेला. (घरासमोरून)

३) सगळा **वर्ग** हसला. (सगळे विद्यार्थी)

## शब्दशक्ती

- अभिधा
  - १) योग अभिधा
  - २) रूढ अभिधा
  - ३) योगरूढ अभिधा
- लक्षणा
  - निरूढा लक्षणा
  - प्रयोजनवती लक्षणा
    - गौणी लक्षणा (सादृश्य)
      - १) सारोपा गौणी
      - २) साध्यवसाना गौणी
    - शुद्धालक्षणा/ सादृश्येतर
      - १) सारोपा शुद्धा
      - २) साध्यवसाना शुद्धा
      - ३) उपादान शुध्दा लक्षणा/ अजहल्लक्षणा
      - ४) लक्षण लक्षणा शुध्दा लक्षणा/जहल्लक्षणा
- व्यंजना
  - शाब्दी व्यंजना
    - १) अभिधामूलक शाब्दी व्यंजना
    - २) लक्षणामूलक शाब्दी व्यंजना
  - आर्थी व्यंजना
    - १) वस्तू ध्वनी
    - २) रस ध्वनी
    - ३) अलंकार ध्वनी